# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २१/०८/२०२४ (बुधवार) सकाळ**

---

### मोटारपंप चोरी करणारे आरोपी रामटेक पोलीसांच्या जाळयात

दिनांक २०/०८/२०२४ रोजी सकाळी ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– कुंजीलाल मानीकराव बरबटे वय ४८ वर्ष रा. चाचेर ता. मौदा जि. नागपुर हे घरी हजर असताना शेतात काम करणारा अमोल काठोके यांनी फिर्यादीला फोन करून सांगीतले की शेतात घरात ठेवलेली तिन एच पी मोनो ब्लॉक कंपनीची मोटारपंप किंमती अंदाजे १००००/– रू ही तीन इसम आपल्या दोन मोटार सायकलवर घेउन जात आहेत. अशा मिळालेल्या माहिती वरून फिर्यादी मोटार सायकलने शेताकडे जात असता तीन इसम दोन मोटार सायकलनी येतांनी दिसले असता त्यांना थांबविले व त्यांना १०.०० वा. सुमारास पकडले. त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता **१) तेजराम रामदास साखरवाडे रा. चाचेर ता. मौदा जि. नागपुर २) जितेद्र रमेश येळने रा. तारसा ता मौदा जि. नागपुर ३) रेकराम उर्फ रेखराम जगन गनविर रा. बाम्बोडे चौक कामठी** असे सांगितले. त्यांचेकडे तिन एच पी मोनो ब्लॉक कंपनीची मोटारपंप किंमती अंदाजे १००००/–रू मोटारसायकल क्र एम एच ३६ एन ७९१७ किंमती २५,०००/–रू. मोटार मिळुन आली व दुसरी बजाज पल्सर मोसा ४० यु ३५०७ किमती अंदाजे २५,०००/–रू. असा एकुण ६०,०००/–रू. चा मुद्देमाल तीन्ही आरोपीकडे मिळुन आला. तिन्ही इसमांना रामटेक पोलीसांनी अटक केली आहे. मोटार तिन्ही आरोपी चोरून घेउन जातांनी मिळुन आल्याने त्यांचे विरूदध पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२) ए, ६२, ३(५) बी एन एस अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोना उमेश गाढवे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोनि प्रशांत काळे, पोहवा नारायण भोयर, नापोशि उमेश गाढवे, पोअं. ब्रिजेशकुमार राउत, वाघमारे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर